# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक**

सर्व मा.सांविधानिक अधिकारी, मा.विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, मा.संचालक, प्रशाला आणि मा.शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन विधान भवन, नागपूर येथे सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ पासून सुरु होत आहे. सदर अधिवेशनाच्या अनुषंगाने विद्यापीठास प्राप्त झालेल्या तारांकित/अतारांकित प्रश्नांची उत्तरे तसेच उत्तरासोबत पाठविण्यात येणारी पूरक टिपणी परिपूर्ण व स्वयंस्पष्ट असावी. तसेच उपस्थित करण्यात आलेल्या प्रकरणाची पुर्वपिठीका, सद्यस्थिती तसेच विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने उपस्थित होऊ शकणारे उपप्रश्न, उपलब्ध आकडेवारी, सहपत्रे इत्यादींबाबत स्पष्ट अभिप्राय टिपणीत असणे आवश्यक आहे.

सबब, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व पूरक टिपणी समर्पक व परिपूर्ण असलेबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी खात्री करुन विद्यापीठास प्राप्त झालेल्या तारांकित/अतारांकित प्रश्नांची उत्तरे/पूरक टिपणी शक्यतो त्याच दिवशी शासनास सादर करण्यात यावी, विधानमंडळ कामकाजाचे गांभीर्य पाहता विलंब टाळण्यात यावा.

तसेच या अधिवेशनाच्या कालावधीत सर्व मा.सांविधानिक अधिकारी, शिक्षक व गट-अ मधील अधिकाऱ्यांनी मा.कुलगुरु यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय तसेच इतर सर्व सेवकांनी मा.कुलसचिव यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय त्यांचे मुख्यालय सोडू नये.

उपरोक्त संबंधितांनी या कालावधीमध्ये शक्यतो रजा घेऊ नये.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/४८१८. )
दिनांक : १९ डिसेंबर, २०२२ )

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व सांविधानिक अधिकारी
२. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
३. सर्व संचालक, प्रशाला
४. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

} **यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.**